स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविज्ञान विद्याशाखे अंतर्गत
राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर
करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास"
(कालखंड २००९ ते २०१९)

❖ संशोधक ❖

आकाश शेषराव बांगर

❖ मार्गदर्शक ❖

प्रा. डॉ. विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र
विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली
आणि
अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्च - २०१९

" हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास " (कालखंड २००९ ते २०१९)

प्रस्तावना (Introduction)

भारतीय संविधात्मक इतिहासाच्या दृष्टिकोनातून आणि प्रांतीय स्तरावर कायदेमंडळ स्थापन करण्यामध्ये १८६१ च्या कायद्याला खास महत्व आहे. कारण की, १८६१ च्या कायद्यानूसार प्रांतीय स्तरावर कायदेमंडळाची तरतूद करण्यात आली. या कायद्यानूसार मुंबई व मद्रास या दोन प्रांतांमध्ये कायदेमंडळ निर्माण करण्याची तरतूद केली. तदनंतर १९०९ मोर्ले मिंटो सुधारणा कायद्यानूसार केंद्रीय कायदेमंडळाप्रमाणेच प्रांतीय कायदेमंडळाचा विस्तार करण्यात आला. पुढे चालून १९१९ चा माँटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा करण्यात आला. या कायद्याने भारतात प्रांतीय स्तरावर जबाबदार शासन निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. प्रथमच प्रांतांना काही विषय देण्यात आले होते. प्रांतांना विषय देऊन या कायद्याने प्रांतसुची तयार केली. या कायद्यामधून विषयांची विभागणी ही संघराज्याची एक आवश्यकता पूर्ण करुन संघराज्य प्रणालीची सुरुवात भारतामध्ये १९१९ च्या कायद्याने केली आहे. आणि १९३५ च्या भारत प्रशासन कायद्याने संघराज्य शासन पध्दतीची तरतुद केली व केंद्र - प्रांत अशी एक संघराज्य स्थापन करण्याची कल्पना भारतामध्ये या कायद्याने ग्रंथीत करण्यात आली. १९३५ च्या कायद्याने प्रांतीय स्वायत्ततेची तरतुद करुन प्रांतांना स्वायत्त घटकाचा दर्जा दिला व प्रांतांमध्ये पूर्णपणे जबाबदार शासनाची सुरुवात केली. एकूणच १९६१, १९०९, १९१९ आणि १९३५ च्या कायद्यांनी भारतामध्ये संघराज्य शासन प्रणालीच्या माध्यमातून राज्य स्तरावर विधिमंडळ निर्माण करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार करुन भारत एक गणतंत्र राष्ट्र बनले संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केल्यामुळे मध्यवर्ती सरकार प्रमाणेच प्रत्येक घटक राज्यामध्ये भारतीय संविधानाच्या १६८ व्या कलमानुसार विधानसभा हे कनिष्ठ सभागृह निर्माण करण्यात आलेले आहे. अशा या सभागृहाचा कालावधी पाच वर्षे असतो. ज्याप्रकारे केंद्र स्तरावर राष्ट्रीय प्रश्नांना

महत्व देण्यात येते त्याचप्रमाणे घटक राज्यांमध्ये तेथील प्रश्नांविषयी, विकास कार्याविषयी, समस्येविषयी व राज्याच्या जनतेकरीता कल्याणकारी योजना राबविण्याचे काम राज्य विधिमंडळाच्या माध्यमातून पार पाडल्या जाते. प्रत्येक विधानसभा मतदार संघाची आपली वेगळी ओळख, विशेषता व काही निर्धारक तत्व असतात. ज्यामध्ये ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी सोबतच राजकय प्रतिव्दंद, राजकीय समीकरणे, स्थानिक पक्ष यांच्या सोबतच अनेक विविध तत्व प्रभावी असतात. जे व्यक्तीगत रुपाने त्या मतदार संघामधील लोकप्रतिनिधींना प्रभावित करतात. त्यामुळे काळानुरुप कालांतराने मतदार संघातील परिस्थितीचे स्वरुप बदलत जात असते. कामाचे स्वरुप, समस्या, विकासाच्या दिशा बदलतात. त्यामुळे विधानसभा मतदारसंघ कामकाजाचा अभ्यास करणे आजच्या परिस्थितीत महत्वपूर्ण बाब आहे.

विधानसभेमधील विधानसभा सदस्य हा विशिष्ट मतदार संघातील जनतेनी थेट निवडून दिलेला असतो. त्यामुळे त्या लोकांचे प्रतिनिधीत्व विधिमंडळात करीत असतो. लोकांचे प्रतिनिधीत्व विधीमंडळात करीत असतांना राज्य सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहचविणे, त्याचा लाभ सामान्य जनतेला मिळत नसेल तर त्याविषयी आवाज उठविणे, एखादा कायदा आपल्या मतदार संघासाठी आवश्यक वाटल्यास सूचना करणे किंवा अस्तित्वात असलेल्या कायदयात दुरुस्त्या करणे आणि त्या दृष्टीने विधानसभेत खाजगी विधेयक मांडणे, विधानसभा मतदार संघामधील विविध कामाचा पाठपुरावा करणे, मतदार संघात कल्याणकारी योजना राबविणे, जनतेचे प्रश्न सोडविणे अशी अनेक कामे विधानसभा सदस्याला करावयाची असतात. या व्यतिरिक्त विधीमंडळातील चर्चांमध्ये सहभाग घेणे, एखादया प्रश्नावर अभ्यासपूर्ण मांडणी करणे, विधानसभेचे अधिवेशन चालू असताना सरकारच्या भूमिकेबाबत, कार्याबाबत प्रश्न विचारणे, माहिती घेणे, त्यावर आपले मत मांडणे, आपल्या मतदार संघामधील मतदारांच्या आशा आकांक्षा राज्य सरकारपर्यंत पोहचविणे हे विधानसभा सदस्याचे कार्य आहे. एक प्रकारे विधानसभा सदस्य हा जनता आणि राज्य सरकार यांच्यामधील दुवा म्हणून काम करतो.

राज्य विधानसभा मतदार संघाशी संबंधीत विषयावर प्रकाश टाकल्यास असे दिसून येते की, राज्यामधील विविध प्रश्नांवर सुक्ष्म अभ्यास करण्यात आलेला आहे. परंतु विधानसभा कामकाजाबाबत किंवा विधानसभा सदस्यांचा कामकाजामधील सहभाग याविषयी कोठेतरी कमी प्रमाणात संशोधन अभ्यास झाल्याचे पाहावयास मिळते. म्हणून या दृष्टीने विचार

केल्यानंतर मी प्रस्तुत संशोधनासाठी **"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास" (कालखंड २००९ ते २०१९)** हा विषय निश्चित केला आहे.

संशोधन समस्या (Research Problem):-

कॅबिनेट मिशन योजना १९४६ मध्ये प्रांताविषयी एक शिफारस केली होती की, प्रत्येक प्रांताव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या त्या प्रांतातील लोकसंख्येवर निश्चित करण्यात येईल. याच तरतुदीचे प्रतिबिंब लोकसभा व विधानसभा मतदार संघांची सदस्य संख्या निश्चित करण्यावर दिसून येते. भारतीय संविधानाच्या १७० व्या कलमानुसार विधानसभा सदस्य संख्या ही त्या-त्या राज्यामधील लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये ठरविण्यात येते. त्यानूसार महाराष्ट्र विधानसभेची सदस्य संख्या २८८ आहे. या २८८ पैकी आपण सुध्दा आपल्या विधानसभा मतदार संघातून आपला एक प्रतिनिधी निवडून देतो. तो लोकप्रतिनिधी आपल्या मतदार संघाविषयी विधीमंडळात काय भुमिका मांडतो? विधीमंडळ कामकाजामध्ये स्वमतदार संघाचा कसा लेखाजोखा मांडतो? विधीमंडळ कामकाजामध्ये आपल्या लोकप्रतिनिधीचा सहभाग कसा आहे? त्याने कोणकोणत्या महत्वाच्या बाबींना किती प्रमाणात महत्व दिले आहे? तसेच मतदार संघाचे विधानसभेत प्रतिनिधीत्व करत असतांना कोणत्या प्रकारचे भरीव कार्य केले? हे करतांना कोणकोणत्या संसदीय आयुधांचा वापर करुन सभागृहात प्रभाव निर्माण केला का? या सर्व बाबींचा शोध घेण्याच्या उद्देशाने मी **"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (कालखंड २००९ ते २०१९)"** हा विषय निवडला आहे

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Research Subject):-

प्रस्तुत संशोधनासाठी **"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास" (कालखंड २००९ ते २०१९)** हा विषय निवडला आहे. लोकशाही शासनव्यवस्थेत कायदेमंडळ (विधानसभा) हे अतिशय महत्वपूर्ण असे सभागृह आहे आणि या सभागृहात आपआपल्या मतदार संघातील समस्यांवर

चर्चा केली जाते व ती समस्या सोडविण्यासाठी सफल प्रयत्न केले जातात. त्या अनुषंगाने हिंगोली विधानसभा मतदार संघामधील विकास कार्यात समकारात्मक व समाधानकारक विकास झाला काय तसेच विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधीने आपल्या मतदार संघाविषयी विधिमंडळात काय भूमिका प्रतिपादन केली आहे हे तपासणे आजच्या काळाची गरज आहे असे प्रस्तुत संशोधकास वाटते. विधानसभेतील कामकाजाची पध्दती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आपले लोकप्रतिनिधी कशा प्रकारे आपल्या मागण्या मांडतात त्यावर कसे एकमत घडवून आणतात व संभाषण कौशल्याच्या माध्यमातून आपले मत सर्व सदस्यांना पटवून आपली समस्या सोडविण्याचा कशाप्रकारे यशस्वी प्रयत्न करतात या सर्व बाबींची माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनाचे महत्व असणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives):-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) हिंगोली विधानसभा मतदारसंघाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणुन घेणे.

२) महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजामध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध संसदीय आयुधांचा अभ्यास करणे.

३) हिंगोली विधानसभा मतदार संघातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती जाणुन घेणे.

४) हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींच्या विकास कार्याविषयी जाणुन घेणे.

५) हिंगोली विधानसभा लोकप्रतिनिधीकडून विधानसभा सभागृहातील कामकाजाचा अभ्यास करणे.

६) हिंगोली विधानसभा मतदार संघ व जिल्ह्यातील इतर विधानसभा मतदारसंघ यांच्या विकासाविषयी अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके (Research Hypothesis):-

प्रस्तुत संशोधन विषयासंबंधी संशोधकाने पूर्वानुमानाच्या आधारावरती काही गृहितक निश्चित केली आहेत ती खालीलप्रमाणे -

१) हिंगोली विधानसभा मतदार संघाची ऐतिहसिक पार्श्वभूमी महत्वाची आहे.

२) महाराष्ट्र राज्य विधिमंडळ सदस्यांसाठी विविध संसदीय आयुधे आहेत.

३) हिंगोली विधानसभा मतदार संघ सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या अति मागास आहे.

४) हिंगोली विधानसभा मतदारसंघातील २००९ ते २०१९ या काळातील लोकप्रतिनिधीकडून केलेले कार्य महत्वाचे आहे.

५) हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधीबद्दल विधानसभा सभागृहात मतदारसंघातील समस्या प्रभावीपणे मांडलेल्या नाहीत.

६) हिंगोली जिल्ह्यातील इतर विधानसभा मतदारसंघाच्या तुलनेत हिंगोली विधानसभा मतदारसंघ मागास आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology):-

"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास" (कालखंड २००९ ते २०१९) या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजातील सहभागाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

अभ्यासक्षेत्र (Area of Study):-

प्रस्तुत संशोधनासाठी **"हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास" (कालखंड २००९ ते २०१९)** या संशोधन समस्येच्या अनुषंगाने अभ्यास करतांना महाराष्ट्र विधानसभेतील इ.स. २००९ ते २०१९ या काळातील हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींचा विधिमंडळ कामकाजामधील सहभागाचा अभ्यास केला जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection):-

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधनासाठी प्राथमिक व व्दितीय साधनांचा उपयोग करण्यात येईल.

प्राथमिक साधनांमध्ये विशेषत: अनुभवजन्य पध्दतीचा वापर केला जाईल. यामध्ये प्रत्यक्ष हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी चर्चा, विचार विनिमय करुन तथ्य संकलन करण्यात येईल.

व्दितीय साधनांमध्ये शासकीय अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, विधीमंडळ कामकाजाच्या लेखी दस्तऐवजांचाआधार घेतला जाईल. सोबतच हिंगोली विधानसभा मतदार संघाशी संबंधीत शासनाची ध्येयधोरणे, अंमलबजावणी यांचा देखील उपयोग घेतला जाईल व इंटरनेटचा उपयोग केला जाईल.

तथ्यांचे विश्लेषण (Data Analysis):-

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्यांचे संकलन केले जाणार आहे. या संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा (Chapter Planning)

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व पैलु लक्षात घेता अभ्यासाकरीता विषयाची मांडणी सात प्रकरणात केलेली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहितके, संशोधन पध्दती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, अध्ययन क्षेत्र व संशोधन आराखडा इत्यादी घटकांची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : हिंगोली विधानसभा मतदार संघाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली विधानसभा मतदारसंघाची ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : हिंगोली विधानसभा मतदारसंघाची जडणघडण व स्थिती

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली विधानसभा मतदार संघाच्या जडण-घडणी विषयी व मतदार संघातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल. राजकीय पक्ष व नेतृत्वाची हिंगोली विधानसभा जडण घडणीत भूमिका याविषयी विवेचन करण्यात येईल.

प्रकरण चौथे : महाराष्ट्र विधानसभेची कामकाज प्रक्रिया व सदस्यांकरीत उपलब्ध असलेली संसदीय आयुधे

प्रस्तुत प्रकरणात राज्यपालांचे अभिभाषण, अल्पसूचना प्रश्न, शुन्य प्रहरातील कार्य, अर्धातास चर्चा, प्रश्नोत्तराचा तास, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, मत्रीमंडळावरील अविश्वास प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, विधी विषयक कार्य, हक्कभंग सूचना अशा विविध बाबींचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : हिंगोली विधानसभा मतदारसंघामधील लोकप्रतिनिधींचा महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजामधील सहभाग

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली विधानसभा मतदार संघातील इ.स. २००९ ते २०१९ या कालखंडामध्ये निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीव्दारे उपयोग केलेल्या संसदीय आयुधांचा वापर व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कामकाजामधील सहभागाचा अभ्यास करुन विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : इ.स. २००९ ते २०१४ व २०१४ ते २०१९ या दोन कालखंडामधील लोकप्रतिनिधींचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात इ.स. २००९ ते २०१४ व इ.स. २०१४ ते २०१९ या कालावधीत हिंगोली विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधीच्या कामकाजाचा, विकासकार्याचा, ध्येयधोरणांचा, अंमलबजावणीचा, मतदार संघात राबविण्यात आलेल्या विविध योजनांचा तौलनिक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरणे सातवे: सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये अभ्यास विषयामधून निष्पन्न झ ालेले निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी आणि त्यावर आधारीत महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भग्रंथ सूची (Bibliography):-

१) योगेंद्र यादव, सुहास पळशीकर, पीटर डिसुझा	-	भारतीय उपखंडातील वैशिष्ट्यपूर्ण लोकशाहीचा शोध, लोकशाही जिंदाबाद, समकालीन प्रकाशन, पुणे, जाने. २०१०, ऑक्टो. २०११.
२) एन.के. गोस्वामी	-	भारत में संसदीय व्यवस्था, अविष्कार पब्लिशर्स, जयपूर२००५.
३) के.टी. गिरमे	-	विधानसभा परिचय आणि कामकाज
४) महाराष्ट्र विधिमंडळ	-	राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा प्रधान सचिव विलास पाटील.
५) एस.एच. बेलवडी	-	Maharashtra Legislative Assembly 50 years (1957 – 1987) It's growth and work.
६) Marice Duverger	-	Political Parties – their policies and programes.
७)	-	Maharashtra Legislature, Mumbai, Legislative Bodies in India.
८)	-	Maharashtra State Assembly election 2009 12th Maharashtra Legislative Assembly.
९)	-	Maharashtra State Assembly

election 2014 13th Maharashtra Legislative Assembly.

१०) - District wise list of Assembly and Parliamentory Constitutencies Chief Electrol Offices Maharashtra, 18 March 2010.

११) भारतीय संविधानाचे तौलनिक वैशिष्ट्ये व विधिमंडळ कामकाज.

१२) महाराष्ट्र विधानसभा नियम - २०१४, ११ वी आवृत्ती

१३) प्रा. बी.वाय. कुलकर्णी - भारतीय शासन आणि राजकारण

१४) D.D. Basu - Introduction to the Constitution of India 19th Edition 2001.

१५) V.D. Mahajan - The Constitutional History of India

१६) D.D. Basu - Constitutioal Law of India, 7th Edition, May 1998.

१७) भा.ल. भोळे - भारतीय शासन आणि राजकारण

१८) प्रा. भा.तु. देशमुख - भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन

१९) प्रा. घांगरेकर, डॉ. कवढाळकर - भारतीय राजकीय व्यवस्था

२०) अनंत कळसे (संकलन) - भारतीय संविधानाची तौलनिक वैशिष्ट्ये व विधीमंडळ कामकाज, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २०१५.

शासकीय अहवाल (Government Report):-

१) मानवविकास अहवाल, महाराष्ट्र शासन मुंबई

२) महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन (हिवाळी अधिवेशन २००९-२०१९).

मासिके (Journals):-

१) प्रतियोगिता दर्पण

२) लोकराज्य

३) यशमंथन

४) योजना

वृत्तपत्रे (News Paper):-

१) दैनिक लोकसत्ता

२) दैनिक सकाळ

३) द हिंदु

❖ संशोधक ❖

आकाश शेषराव बांगर

❖ मार्गदर्शक ❖

प्रा. डॉ. विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र
विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर)
आदर्श महाविद्यालय, हिंगोली
आणि
अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड